यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
परीक्षा विभाग

जा.क्र.पनिका/2020/694 दि.10/12/2020

ऑनलाईन परीक्षेसंबंधी सूचना
बॅकलॉग / पुर्नपरीक्षार्थी परीक्षा- डिसेंबर- 2020

विद्यार्थ्याने आपल्या पेपरचा दिनांक व वेळ वेळापत्रकानुसार आधीच पाहून खात्री करावी व मगच परीक्षा द्यावी.

1) ऑनलाईन लॉगईन स्लॉट टाईम

M = Morning = सकाळी - 8.00 AM To 1.00 PM

A = Afternoon = दुपार - 3.00 PM To 8.00 PM

परीक्षा पद्धती – बहुपर्यायी प्रश्न, प्रत्यक्ष परीक्षा = 60 मिनिटे वेळापत्रकातील प्रोग्रॅम कोडनुसार आपला पेपर किती तारखेला किती वाजता, कुठल्या लॉगईन स्लॉट मध्ये आहे ते पाहून विद्यार्थ्याने पुरेशा वेळ आधी परीक्षेला सुरुवात करावी. लॉगईन स्लॉट टाईम 5 तासांचा असला तरी प्रत्यक्ष परीक्षेचा वेळ 60 मिनिटे आहे, त्या कालावधीत परीक्षा संपवणे आवश्यक राहील. विद्यार्थ्याने परीक्षेला उपलब्ध 50 प्रश्नांपैकी 30 प्रश्न 60 मिनिटांत सोडवायचे आहेत. प्रत्येक प्रश्नाला 2 गुण याप्रमाणे 60 गुणांची परीक्षा होईल आणि 60 गुणांचे रुपांतर 80 गुणात करण्यात येईल.

2) वेळापत्रकानुसार परीक्षा दोन सेशनमध्ये सकाळी (M) 8 ते 1 व दुपारी (A) 3 ते 8 या वेळेत होईल.

3) कुठल्याही कारणास्तव ऑनलाईन परीक्षा (बंद) टर्मिनेट झाल्यास (उदा- इंटरनेट कनेक्टीव्हिटी, पॉवर सप्लाय, अन्य कारणे) विद्यार्थ्याला दिलेल्या लॉग ईन स्लॉट टाईम मध्ये पुन्हा एकदा लॉग ईन होऊन परीक्षा पूर्ण करता येईल आणि त्याला त्याच्या शिल्लक वेळच पुन्हा उपलब्ध होईल.
उदा- एखादा विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा सुरु केल्यानंतर 10 मिनिटांतच कुठल्याही कारणाने ऑनलाईन प्रणालीतून बाहेर पडला आणि परीक्षा थांबली तर तो विद्यार्थी दिलेल्या लॉग ईन स्लॉट टाईम मध्ये पुन्हा लॉग ईन होऊ शकेल, त्याला त्याचा उरलेला वेळ 50 मिनिटे मिळेल, त्याने पूर्वी सोडविलेल्या प्रश्नांशिवाय शिल्लक प्रश्न सोडवण्यास उपलब्ध होतील.

4) विद्यार्थ्याने शक्यतो लॉग ईन स्लॉटच्या सुरुवातीस लवकर परीक्षा देण्यास सुरुवात करावी, जेणे करून जर काही तांत्रिक अडचण निर्माण झाली, तर ती अडचण सोडविण्यास पुरेसा वेळ त्या लॉग ईन स्लॉट टाईम मध्ये उपलब्ध असेल आणि विद्यार्थ्यांला दिलेल्या लॉग ईन स्लॉट टाईममध्ये परीक्षा पूर्ण करता येईल.

5) डिसेंबर - 2020 ऑनलाईन परीक्षा व सराव परीक्षा लिंक :- **https://ycmou.unionline.in**

सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा !

10/12/20

परीक्षा नियंत्रक (प्र.)